
# APH PUBLISHING CORPORATION


APH

4435-36/7 ANSARI ROAD
DARYAGANJ, NEW DELHI-110 002
Tel.:011-23274050/9810121903/9810136903/9818581487
E-Mail:aphbooks@gmail.com
(Publishers of Educational Journals and Books for last 45 years)


## CERTIFICATE OF APPRECIATION

This certificate is awarded to ........ नरेन्द्र ब. रघाटे ........
........ आत्महत्या या समस्ये संदर्भात एक तात्विक विश्ले
for contributing their Article/Research Paper in our Journal........ EDU WORLD ........
ISSN 2319-7129 Volume No........ XII ........Issue Number ........ 22 ....for month/year
........ April 2018




Place of Issue-New Delhi

APH PUBLISHING CORPORATION
4435-36/7, Ansari Road, Darya Ganj,
New Delhi-110002

Authorized Signatory
APH PUBLISHING CORPORATION
NEW DELHI


Scanned with CamScanner

Vol. XII
Number-22

ISSN 2319-7129
(Special Issue) April, 2018

UGC Notification No. 62981

# EDU WORLD

A Multidisciplinary International
Peer Reviewed/Refereed Journal

APH PUBLISHING CORPORATION

Scanned with CamScanner

ISSN : 2319-7129

# EDU WORLD

## A Multidisciplinary International Peer Reviewed/Refereed Journal

**Vol. XII, Number - 22** **April 2018**

(*Special Issue*)

*Chief Editor*

**Dr. S. Sabu**

Principal, St. Gregorios Teachers' Training College, Meenangadi P.O., Wayanad District, Kerala-673591. E-mail: drssbkm@gmail.com

*Co-Editor*

**S. B. Nangia**

**A.P.H. Publishing Corporation**

4435–36/7, Ansari Road, Darya Ganj,
New Delhi-110002

Scanned with CamScanner

# CONTENTS


Politics with Dharma: Gandhian Approach to Secularism 1
***Dr. Aditya K. Gupta***

A Study of Tertian Malaria, Typhoid, and their Coinfection Among Febrile Illness Patients at a Dahod District of Gujarat State 6
***Dr. Navneet Kumar Singh***

Changing Mortality During Colonial Times: A Case Study of Famine Districts of the Madras Presidency 13
***Dr. Madhuri Sharma***

Relationship of Educational Commitment with Academic Achievement of Secondary School Students 23
***Onkush Verma and Dr. Kiran Mathur***

River Erosion and its Impact on Livelihood of Char Dwellers of Assam 28
***Dr. M. Seik Mozibar Rahman***

Food Enzymes: Issues, Challenges and Future Prospects 35
***Neerja Masih***

A Study on Career Awareness Among Students of Standard IX a From a Secondary School, Mumbai 43
***Ms. Nishi Kumar***

Theoretical and Historical Formulation of Nation Building in Saudi Arabia 54
***Azeemah Saleem***

ओशो का कम्यून और विभिन्न थिरैपी केन्द्र : एक ऐतिहासिक अनुशीलन 59
***डॉ. शैलेन्द्र कुमार शर्मा***

जलवायु परिवर्तन और पर्यावरण प्रभाव 66
***डॉ. अर्चना त्रिपाठी***

महिलाओं के लिए पारिवारिक संरचना का आशय : समाजशास्त्रीय विश्लेषण 69
***डॉ. ऋतु दीक्षित***

मार्कण्डेय की कहानियों में लोक-जीवन 72
***डॉ. राम पाण्डेय***

डॉ. अम्बेडकर के चिन्तन में स्त्री विमर्श एवं धर्म 76
***डॉ. जगदम्बे यादव***


Scanned with CamScanner

वयं राष्ट्रे जागृयाम पुरोहिता — 82
*डॉ. (श्रीमती) प्रमिला तिवारी*

भारत में महिला सशक्तिकरण — 84
*डॉ. उमेश प्रसाद यादव*

'निर्मला' उपन्यास का वर्तमान समय अनुसार आलोचनात्मक अध्यन — 88
*रजनी शर्मा*

ಶೀರ್ಷಿಕೆ: ಲೇಪಾಕ್ಷಿಯ ವೀರಭದ್ರ ದೇವಾಲಯದ ವರ್ಣಚಿತ್ರಕಲೆ — 93
ಅಂಜನಮೂರ್ತಿ.ಪಿ.ಕೆ.

Electoral System in India — 102
***Dr. Vibha Gupta***

The Use of Symbols in the Songs of Innocence and Experience — 106
***Dr Madhu Jain***

Geological Formation of the Western Palamau Upland Jharkhand (India) — 109
***Dr. Ramchet Singh Yadav***

Lattice Vibrations — 117
***Dr. Pawan Srivastava***

Major Themes in the Novels of Graham Greene — 126
***Dr. Sangeeta Arora***

भारत में वाल श्रमिक (सामाजिक-आर्थिक स्थिति एवं संवैधानिक प्रावधान) — 131
*डॉ. श्रवण राज*

'आत्महत्या या समस्ये संदर्भात एक तात्विक विवेचन — 141
*प्रा. श्री नरेन्द्र व. रघटाटे*

Haunting Past of America in Toni Morrison's *Beloved* — 146
***Dr. Jyoti Agarwal***

Guidelines for Contributors — 155

**Scanned with CamScanner**

# 'आत्महत्या' या समस्ये संदर्भात एक तात्विक विवेचन

प्रा. श्री नरेन्द्र व. रघटाटे*

हे एक अढळ सत्य आहे की, ज्या वस्तुची उत्पत्ती होते त्याचा विनाशही अवश्यच आहे. जीव जन्म घेतो व अंती मृत्युला जाऊन मिळतो. याचा अर्थच कोणतीही गोष्ट शाश्वत नाही, नित्य नाही. जेथे जीवन आहे तेथे मृत्यु सुध्दा आहे. म्हणजेच जीवन आणि मृत्यू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. परंतु येथे गुणात्मक दृष्टया अभाव दिसून येतो कारण जीवनाला शुभ आणि मृत्युला अशुभ माणल्या गेले आहे. मृत्यू अशुभ याकरिता आहे की, येथे जीवनाचा अभाव आहे.

भारतीय तत्त्वज्ञानात जीवन तथा मृत्यू यावर खूप विचार मंथन झालेले दिसुन येते. बौध्द दर्शनातील 'प्रतित्मसमुत्पाद' सिध्दांत याचे ज्वलंत उदाहरण आहे. या दर्शनात सिध्दांतातील दोन कडयांच्या माध्यमाद्वारे प्रयत्न केल्या गेला आहे की, जीव वारंवार का जन्म घेतो आणि अंती मृत्यूला प्राप्त होतो. मला बौध्द दर्शनात 'जीवन–मृत्यु चक्र' (The Cycle of life and Death) सुध्दा म्हटल्या गेले आहे. जीवन ही ईश्वराची अमूल्य देण आहे. भौतिक जगतात जीवाचा प्रवेश जन्माद्वारे होतो परंतु या जीवनाच्या अंताचे विविध प्रकार असू शकतात. जसे, दीर्घकालीन असाध्य रोग, नैसर्गिक आपत्ती, रोड, रेलमार्ग, वायूमार्ग, जलमार्ग याद्वारे होणाऱ्या दुर्घटना, भूस्खलन कोरडा–ओला दुष्काळ, इत्यादी.

जीवन आणि मृत्यूचा प्रश्न जरी ईश्वरी इच्छेवर निर्भर असला तरी मानवबुध्दि नेहमीच या रहस्यावर विचार करीत आली आहे की, कांय, व्यक्तिला हा अधिकार आहे की तो आपल्या जीवनाला स्वेच्छनी समाप्त करु शकतो? हा प्रश्न सदैवच विवादास्पद राहीलेला आहे. या संबधी तत्त्वज्ञांचे दोन मतप्रवाह दिसून येतात. काहीच्या मते, व्यक्तिला आपली जीवनलीला संपविण्याचा पूर्ण अधिकार आहे. तर काही तत्त्वज्ञ या प्रश्नाप्रति नकारात्मक विचारधारा ठेवतात. त्यांचा मते, व्यक्तिला आपले जीवन संपविण्याचा तिळमात्रही अधिकार नाही. संशयवादी तत्त्वज्ञ हयूम या व्यतिरिक्त इतर तत्त्वज्ञ जसे सिनिक्स, स्टॅाईक्स, भोगवादी एपिक्युरीअन्स या संप्रदायाच्या अभ्यासकांचे मत आहे की, व्यक्तिला हा अधिकार आहे की तो आपली जीवनज्योत स्वतः विझवून या भौतिक जगाचा त्याग करु शकतो. पायथागोरस, प्लेटो आणि ॲरिस्टॅाटल हे तत्त्वज्ञसुध्दा मानव जीवनाला ईश्वराची पवित्र निर्मिती मानतात. म्हणून व्यक्तिला हा अधिकार नाही की त्याने या ईश्वरनिर्मित पवित्र वस्तूचा (जीवाचा) नाश करावा. ॲरिस्टॅाटलतर ईथपर्यंत मानतो की, आत्महत्या समाजातील नैतिक नियम किंवा कायद्याच्या उल्लंघनाची एक घटना आहे.

आत्महत्येच्या तत्त्वज्ञानिक व्याख्ये संदर्भात विल डयुरंट म्हणतात की, जीवनाच्या रंगमंचावर अवतरित होण्याचा मार्ग एक आहे. परंतु यातून बाहेर जाण्याचे मार्ग आनेक आहेत तथा आत्महत्या त्या अनेक मार्गांपैकी एक मार्ग आहे.

*तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर. E-mail: raghataten77@gmail.com



Scanned with CamScanner

1. अलबर्ट काम च्या विचारात मानवी जीवनाची एकच गंभीर तत्त्वज्ञानीक समस्या आहे आणि ती समस्या आहे आत्महत्येची. आत्महत्या एक महान कलाकृती सारखीच हृदयाच्या शांततेत आणि निश्चलतेत जन्म घेते.[1]
2. मिरॉक्स प्रमाणेच पिटर सिंगर सुध्दा आपल्या 'प्रॅक्टिकल एथिक्स' या पुस्तकात आत्महत्येसंबंधी विचार करतांना स्वतंत्रता आणि न्याय या बाजू महत्वाच्या समजतात व थिरॉक्सच्या या सिध्दांतास आंशिकरीत्या समर्थन देतात.[2]
3. त्याचप्रामणे, डॉ. नित्यानंद मिश्र[3] यांनी सुध्दा आत्महत्येचा विरोध, याला एक घृणित कार्य म्हणून केला आहे.

भारतीय दर्शनातील वेगवेगळया काळात धर्मिक ग्रंथांमध्ये जसे, वेद, उपनिषद (ईशावास्य), धर्मशास्त्र, भगवद्‌गिता, कॉटिल्याचे 'अर्थशास्त्र' या सर्वांमध्ये आत्महत्येला एक घृणीतकृत्य माणून दंडणीय मानले गेले आहे.

जागतिक स्तरावर याचा विचार करता असे लक्षात येते की, अनेक देशांमध्ये आत्महत्येला सामान्यतः अपराधिक दृष्ट्या बेकायदेशीर मानल्या जात नाही. याची कारणं सांगतांना ते म्हणतात की, एखाद्याने आपल्या इच्छेने आपल्या प्राणाचा अंत केलेला आहे, न की इतरांच्या प्राणाचा. हा व्यक्तिंचा स्तःच्या जीवनाप्रती घेतलेला निर्णय आहे ज्याचा अधार त्यांचे आपले स्वतःचे चिंतन आणि भावना आहे. जगात अशा संस्कृती किंवा देश आहेत जेथे आत्महत्येला सांस्कृतिक आणि सामाजिक मान्यता प्राप्त होती. जसे 'एस्किमो' ही जमात यात वृध्द वा अशक्त व्यक्ती जे समाजासाठी, दुसऱ्यांसाठी लाभदायक कार्य वा उत्पादक कार्य करु न शकल्यामुळे त्यांना समाजमान्यता होती की त्यांनी स्वेच्छेने आपल्या प्राणाचा त्याग करावा. जपान मध्ये 'हाराकारी' ची प्रथा आत्महत्येला समाजात स्वीकृत व्यवस्थेच्या रुपात वर्तमान काळातली चालत आलेली प्रथा आहे. जास्त दूर जाण्यापेक्षा आपल्या भारतातच एकोणिसाव्या शतकात आढळूण येणारी 'सतिप्रथा' ही या प्रकारातील आत्महत्येची एक घटना होती जी वर्तमानकाळातही चालूच आहे.

आत्महत्येच्या संदर्भात साधक–बाधक विचार करतांना ती कृती योग्य की अयोग्य ठरविण्यापूर्वी याचा विचार आवश्यक आहे की, मानव जीवनाचे पोषण कसे होते आणि मानवाचा अभावात काय परिवर्तने उत्पन्न होऊ शकतात. मानवाच्या पोषणा संदर्भात आपण निर्विवादपणे हेच म्हणू शकतो की, जीव शरीराला धारण करतो, ठिक त्याच प्रमाणे जसे नैतिकतेला मानवच धारण करतो. जर मानवच नसेल तर नैतिकतेचा प्रश्नच महत्वहिन होतो. तसेच जर शरीर नसेल तर जीवनसुध्दा राहणार नाही.

आता हे स्पष्ट झाले की जीवनाकरिता शरीर आवश्यक आहे तर यावरुन हे सुध्दा सिध्द झाले की, शरीराचे पोषण एक प्रकारे जीवनाचेच पोषण करणे होय. तेव्हा हे बघणे आवश्यक आहे की, शरीराचे पोषण कसे होते. शरीर पोषणाकरिता काही गोष्टी आवश्यक आहेत. जसे प्रोटिन, कार्बोहायड्रेड, विटॅमिन,खनिज आणि जल. तेव्हा हे म्हणता येईल की, हया सर्व गोष्टी मानवाला निसर्गातूनच प्राप्त होतात. म्हणजेच, मानव जीवन पृथ्वीवर, पृथ्वीच्याखाली धनधान्य, प्राणी, वनस्पती, वातावरण यावर आधारित असते. मग प्रश्न असा निर्माण होतो की, मानवी जीवन या सर्वांवर अवलंबून असतांना यांचा ऋणी नाही काय? मग मानवी जीवनावर या सर्वांचा अधकार नाही काय? की, जीवनावर फक्त मानवाचा स्वतःचाच अधिकार मानावा? या प्रश्नांचा विचार व्हायला हवा. भारतीय दर्शनात यांसदर्भात ऋण ही संकल्पना म्हणूनच अस्तित्वात आली असावी. या व्यतिरिक्त

Scanned with CamScanner

मानवावर परिवार आणि समाज यांचाही अधिकार आहे. हेच सर्व घटक जीवनाकरिता पोषक आहेत. मग असे कसे म्हणता येईल की, जीवनावर व्यक्तिचा स्वतःचा अधिकार आहे? तर, असे आपल्याला म्हणताच येणार नाही.

मग प्रश्न असा निर्माण होतो की, हे सर्व माहित असतांना ही म्हणजेच आपल्या जीवनावर आपला परिपूर्ण अधिकार नाही तरी व्यक्ती फक्त स्वतःचाच विचार कां करतो आणि आपण आपल्या जीवनाप्रती स्वतंत्र आाहे असे मानून आत्महत्येसारखे कृत्य कां करतो. तर याची कारण मीमांसा करतांना असे म्हणता येईल की, व्यक्तिगत जीवनात पैशाची कमतरता किंवा विषण्णता जेव्हा एक सीमारेषा पार करते तेव्हा आत्महत्येचा मार्ग एक असा मार्ग म्हणून सामोर येतो ज्याला व्यक्ती आपली नियती मानून स्वीकार करतो. पलायनवादी प्रवृत्तीच्या व्यक्तिकरिता हा एक अती सरल आणि साधा, सोपा मार्ग आहे.

सिगमंड फ्राईड, कार्ल मेनिंजर आणि विलियम आर. रॉल्फ यांनी आत्महत्येच्या मानसशास्त्रीय कारणांची व्याख्या दिलेली आहे. अहं विश्लेषणाच्या आधारावर आत्महत्येची व्याख्या करतांना फ्राईड म्हणातात की, 'प्रत्येक व्यक्तिमध्ये दोन प्रकारच्या परस्परविरोधी इच्छा आढळतात. ज्यात एक इच्छा मरणाची असते तर दुसरी जीवंत राहण्याची. जेव्हा या दोन इच्छामधील संतुलन बिघडते म्हणजेच असंतुलन निर्माण होऊन जीवनाप्रती जो मोह असतो त्याला घृणेमध्ये परिवर्तित करते तेव्हा मरणाची इच्छा बलवान होऊन व्यक्ति आत्महत्या करण्याकरिता प्रवृत्त होतो'.

आत्महत्येच्या कारणांवर जर एक नजर टाकली तर आपल्याला असे लक्षात येते की, जेव्हा पारिवारिक संबंध आपल्या सीमारेषेपेक्षा जास्त तणावपूर्ण होतात किंवा या दरम्यान तुटतात त्यामुळे ज्या वैयक्तिक विघटनाचा जन्म होतो त्याची परिणती कधी–कधी आत्महत्येत होतांना दिसते. पारिवारिक विघटनाच्या या परिस्थितीत व्यक्ती स्वतःला एकाकी, तसेच काम–इच्छेची भूक, सहानुभूती आणि प्रेमाच्या अभावाचा अनुभव करतो. अशा स्थितीत तो जीवनाप्रती हार मानतो. स्वतःला अशा पारिवारिक आणि सामाजिक स्थितिशी जुळवून घेता न आल्या कारणाने व्यक्ती आत्महत्या करतांना आढळतो. या व्यतिरिक्त आर्थिक अडचणींच्या कारणामुळे सुख–सुविधेच्या साधनांच्या समाप्तीनंतरही, सामाजिक प्रतिष्ठेला जेव्हा हानी पोहोचते तेव्हा सुध्दा, तसेच प्रेमामध्ये असफलता प्राप्त झाल्या कारणांमुळे सुध्दा व्यक्ती आत्महत्या करतांना आढळतो.

असाध्य आणि अचिकित्सिय रोगांच्या जास्त काळापर्यंत टिकल्यामुळे रोगी शारीरिक कष्टाला सहन न करु शकल्यामुळे सुध्दा आत्महत्येला मुक्तिचा एकमेव मार्ग समजून घेतो. काही दुर्धर आजार, तिर्व स्मृतिभ्रंश, मिरगी, चिरकाळ नशा, मादक द्रव्याचे सेवन, मुढता अशा व अनेक कारणांमुळेही व्यक्तित आत्महत्यची प्रवृत्ति बळावते. अर्थात उपरोक्त सर्वच आत्महत्येचे स्त्रोत मानल्या जातात. आत्महत्येच्या वेळी व्यक्तिने आपल्या विवके बुध्दीचा सर्वस्वी त्याग केलेला असतो असे सर्वसाधारणपणे मानल्या जाते, परंतु हे कितपत सत्य आहे याचा विचार करणे गरजेचे आहे.

सर्वसाधारणपणे असे आढळते की, आत्महत्या करणारा व्यक्ती किंवा त्याचा विचार कराणारा व्यक्ती एका अशा व्यक्तिगत संकटाच्या परिवारिक आणि सामाजिक परिस्थितीतून मार्गक्रमित असतो ज्यात त्याला आपले जीवन निराशेने भरलेले, घृणास्पद आणि दोषपूर्ण वाटते. अशा परिस्थितीत मानसिक उपचार करणाऱ्या मनोवैज्ञानिकाचे कर्तव्य महत्वाचे ठरते. तज्ञांने त्या व्यक्तिला भावनिक आधार द्यावा ज्यामुळे त्यातून त्याची दोषभावना, निराशा दूर व्हावी आणि चिंतेचा अंत व्हावा. मनोवैज्ञानिकाने त्यांचे चांगल्या पध्दतीने समुपदेशन करावे. त्याला वारंवार

Scanned with CamScanner

समुपदेशनासाठी बोलवावे, त्याची चिकित्सा करावी. परिवारातील सदस्य तसेच मित्रांची भूमिका देखील यात फार महत्वाची ठरते. मित्रांचे तथा परिवारिक सदस्यांचे हे कर्तव्य ठरते की त्यांनी सुध्दा समजुन घ्यावे, त्याची भावनिक गरज भागवावी. त्याला विश्वासात घ्यावे. त्याची बाजू ऐकुण घ्यावी. त्याला आर्थिक सहायोग, भावनिक सहायता तसेच शारीरिक आधार प्रदान करावा. कधी–कधी तर असेही आढळते की, काही व्यक्ती आपल्या प्रियजनांची सहानुभूती प्राप्त करण्याकरिता आत्महत्येचा अयशस्वी प्रयत्न करतात. तेव्हा अशांना सहानुभूतिपूर्वक वागणूक द्यावी, धिर द्यावा, त्यांना समजून घ्यावे. एखादी व्यक्ती जी आत्महत्या करण्याची खरोखर प्रयत्न करते, अशी लक्षणे जर एखाद्यात आढळत असतील तर आधुनिक मनोचिकित्सेच्या क्षेत्रात याचा उपचार इ.सी.टी. (इलेक्टो कंवल्सिव थेरपी) किंवा सायको फार्मालॉजिकल औषधांद्वारे याचा उपचार केल्या जाऊ शकतो. वर्तमान काळात योग तसेच ध्यान साधनेद्वारा सुध्दा आत्महत्येच्या घटनांना थांबविल्या जाऊ शकते. याद्वारे व्यक्तीच्या मनात, भावनेत, बुध्दित आत्महत्येच्या प्रवृत्तीला हवा देणाऱ्या लक्षाणांना दूर केल्या जाते. अशा व्यक्तीकरिता हे आवश्यक आहे की त्यांच्या हया मानसिक विकारांना शोधल्या जावे आणि त्याचे सुक्ष्मरित्या परिक्षण केल्या जावे. त्यांच्या कारणांची कारणमीमांसा केल्या जावी तरच हे शक्य आहे. तसेच एक महत्वाची गोष्ट म्हणजे तो ज्या परिस्थितीत, वातावरणत राहतो त्याचे सुध्दा परिक्षण करुन हे लक्षात घ्यायला हवे की त्याला आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्या अशा कोणत्या शक्यता आहेत, त्या शोधून त्यावर उपाय करायला हवेत जेनेकरुन तो यापासून परावृत्त होईल, त्याला आधार मिळेल व तो आत्महत्येचा विचारच करणार नाही. आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त होणयाकरिता आणि त्याची थांबविण्याकरिता लहानपाणापासूनच जर योग्य व नैतिकतेचे धडे देण्याचा प्रयत्न केल्या गेले तर, तसेच त्यानुसार व कडक अणुशासनात जीवन घालविले तर आत्महत्येच्या विचारापासून व्यक्तिला प्रवृत्त करता येऊ शकते. त्याकरिता हे आवश्यक आहे की, मानवाने तत्त्वाने, धेय्याने जगायला हवे. कोणत्याही परिस्थितीत तत्वांशी, आपल्या धेय्यांशी तडजोड करायला नको व याकरिता मन कठोर बनविणे आवश्यक आहे तरच हे शक्य आहे. घरात खेळीमेळीचे वातावरण असायला हवे, घरात, समाजात एकमेकांशी व्यक्तींचा संबंध असायला हवे, त्यांच्यात संवाद घडायला हवा. जेवतांना घरात एकमेकांशी बोलायला हवे, त्यांचे विचार जाणून घ्यायला हवे, त्यांना वरिष्ठांनी मार्गदर्शन करायला हवे. शाळेत, समारंभात, सभेत अशा संवेदशीत विषयांवर चर्चा घडाव्यात तज्ञांचे मार्गदर्शन व्हावे, त्याच्या परिणामांची चर्चा व्हावी, त्यावर उपाययोजना कांय याचा विचार करावा, समुपदेशन घडावे तरच आत्महत्येला आळा घातल्या जाऊ शकतो.

एक महत्वाची गोष्ट म्हणजे, आत्महत्येची समस्या फक्त उपचारापर्यंतच सिमित नाही तर प्रत्येक मानवाचे हे नैतिक कर्तव्य ठरते की त्याने अशा व्यक्तिंची सूचना आपल्या शहरातील जवळपासच्या दवाखाण्यात जो मनोचिकित्सक विभाग आहे त्याला द्यावी. हा विषय खुपच संवेदनशील असल्याकारणाने आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तिंवर खटला चालवू नये. म्हणजेच त्याला एक दंडनीय अपराध न मानल्या जावा. आत्महत्येची लक्षणे आढळणाऱ्या व्यक्ती जर समाजात सापडत असतील तर त्यांना ताबडतोब सहायता देण्याचा प्रयत्न करावा. शहरातील प्रत्येक दवाखाण्यात आत्महत्या निरोधी चिकित्सा केंद्राची स्थापना करायला हवी आणि जर असे रूग्ण येत असतील तर त्यांना गंभीरतेने घ्यायाला हवे.

वरील सर्व उपायांचा विचार करता असे म्हणता येईल की, जर आपण सर्वांनी या देशाचे जागृक नागरिक या नात्याने वरिल सर्व उपायांचा आपापल्या परिने व कसोशीने वापर केला तर निश्चितरित्या आत्महत्या

Scanned with CamScanner

यासारख्या निदंनिय कृत्याला काही प्रमाणात आळा घातल्या जाऊ शकतो व या समस्येची उकल होण्यास मदत होऊ शकते, असे मला वाटते.

## संदर्भ व ग्रंथ सुचि


1. डिमरी, मुकेशचंद्र : 'नैतिकता एव सामाजिक विसंगतीया', न्यु भारतीय बुक कार्पोरेशन दिल्ली 2005 पृ. क्र. 181
2. सिंगर, पिटर : प्रॅक्टिकल एथिकस', कॅंब्रिज युनिव्हरसिटी प्रेस 2000, पृ.क्र. 116–120
3. मिश्र, डॉ. नित्यानंद : 'नितिशास्त्रः सिध्दांत और प्रयोग',मोतीलाल बनारसीदास पटना 2005,पृ.क्र. 499
4. मेनिजर, कार्ल : 'मॅन अगेंस्ट हिमसेल्फ' न्युर्यार्क 1938
5. रॉल्फ,विलियम आर. : 'दि सायकोलॉजी ऑफ सुसाईड' जरनल ऑफ ॲबनॉर्मल अॅंड सोशल सायकोलॉजी एप्रिल–जून 1958
6. चौरसिया, एम. पी : 'अनुप्रयुक्त नीतिशास्त्र', मेतिलाल बनारसीदास दिल्ली 2006
7. वर्मा, वेद प्रकाश : 'नीतिशास्त्रके मूल सिध्दांत', अलाईड पब्लिशर्स प्रा. लि. दिल्ली 1982
8. Internet : www.wickepedia free encyclopedia.


Scanned with CamScanner